# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३/ फाल्गुन १७, १९४४ (शके)

२९. **सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे वितरण**

विधानसभेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे टोकन्स **मा.सदस्यांना गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी उपस्थितिपटावर स्वाक्षरी करतांना व तद्नंतर शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत दालन क्रमांक १२०, पहिला मजला, विधान भवन, मुंबई** येथे वितरीत करण्यात येतील. त्यानुसार सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरणाच्या ठिकाणी जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांना वितरीत करण्यात येतील.

| अ.क्र. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेस वितरणाचा कालावधी (३) | ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ | अर्थसंकल्पावरील मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहनतळाच्या मोकळ्या जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये, विधान भवन, मुंबई |
| २. | शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | दालन क्र. १२०, पहिला मजला, विधान भवन, मुंबई |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी.

मा.मंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा पेनड्राईव्ह असलेली सुटकेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ मार्च, २०२३

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री महोदयांसह )
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

\\mls-d3-01\d3-02\2023\Budget Session 2023\Token\BULETIN PART TWO.doc